प्रभात पुणे, सोमवार, दि. १५ जानेवारी २०१८

# अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची सफर



पुणे- रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू शाळेतील विद्यार्थ्यांना नुकतीच एरंडवणे अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची सफर अनुभवली. पंख सामाजिक संस्था आणि क्विकहील फाउंडेशन यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी आग लागते म्हणजे वैज्ञानिक घटना नक्की काय घडते, आगीच्या बंबाला पाचारण कसे करायचे, अग्निशमन विभागाचा फोन नंबर काय? आग विझवण्यासाठी बंबातून पाण्याचे फवारे कसे मारले जातात? विद्यार्थ्यांना पडलेल्या अशा अनेक जिज्ञासू प्रश्नांची उत्तरे मिळाली. या सर्व प्रश्नांची उत्तरे अग्निशमन अधिकारी गजानन पाथ्रुडकर यांनी दिली. पंख सामाजिक संस्थेच्या प्रमुख स्मिता आपटे आणि स्नेहल पाटील तसेच मुख्याध्यापिका शारदा शेटे यावेळी उपस्थित होत्या.

आग लागू नये म्हणून आणि लागल्यास आपली सुजाण नागरिक म्हणून भूमिका कशी निभवायची, मनाचा समतोल राखून प्रसंगी तोंड कसे द्यायचे याचे प्रयोग धडे देण्यात आले. कार्यक्रमात एरंडवणे केंद्रातील अग्निशमन जवानांनी सहभाग घेतला. अग्निशमन दलाकडील वायरलेस अधिकारी वासुदेव एकबोटे यांनी यासाठी परिश्रम घेतले.